# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

(स्थानिक गुन्हे शाखा,सातारा)

दुरध्वनी क्रमांक - ०२१६२-२३३९२३ फॅक्स क्रमांक - ०२१६२-२३०२३२
वेबसाईट - www.satarapolice.gov.in मेल आय डी - pilch.satara@mahapolice.gov.in

प्रेसनोट दिनांक १६ सप्टेंबर २०२२

( स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांची कारवाई.)

पोलीस अभिलेखावरील हद्दपार गुन्हेगाराकडुन दोन गावठी पिस्टल, दोन जिवंत राउंड व १ मोटारसायकल असा एकुण १,७०,४००/- रुपये किमतीचा माल जप्त .

---

मा.अजय कुमार बंसल, पोलीस अधीक्षक सातारा व मा.अजित बोऱ्हाडे, अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी सातारा जिल्हयामध्ये विनापरवाना शस्त्र बाळगणाऱ्या इसमांची माहिती काढुन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना श्री.अरुण देवकर, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने श्री.अरुण देवकर यांनी सपोनि रमेश गर्जे यांच्या अधिपत्याखाली बेकायदेशिर शस्त्र बाळगणाऱ्या इसमांच्यावर कारवाई करणेकरीता एक विशेष पथक तयार केलेले आहे.

दिनांक १५ सप्टेंबर २०२२ रोजी श्री.अरुण देवकर, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांना त्यांच्या बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पोलीस अभिलेखावरील एक हद्दपार गुन्हेगार शेणवडी, ता.माण, जि.सातारा गांवचे हद्दीत शेणवडी फाटा येथे गावठी पिस्टल विक्री करीता येणार आहे. अशी बातमी मिळाल्याने सदर ठिकाणी सापळा लावून कारवाई करणेकामी अरुण देवकर यांनी स्थानिक गुन्हे शाखेकडील पथकास आदेश दिले. त्याप्रमाणे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी शेणवडी फाटा ता.माण जि. सातारा येथे सापळा लावून दिनांक १६ सप्टेंबर २०२२ रोजी मिळालेल्या बातमीतील वर्णनाच्या इसमास पकडून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यात दोन देशी बनावटीची पिस्टल, दोन जिवंत काडतुस (राउंड) व एक मोपेड गाडी असा एकुण १,७०,४००/- रुपयेचा माल हस्तगत करुन जप्त केला आहे. सदर बाबत म्हसवड पोलीस ठाणे येथे भारताचा शस्त्र अधिनियम कलम ३(१),२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदर कारवाईमध्ये श्री अजयकुमार बंसल, पोलीस अधीक्षक सातारा, श्री अजित बो-हाडे, अपर पोलीस अधीक्षक सातारा यांच्या मार्गदर्शनाखाली व श्री अरुण देवकर, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांच्या अधिपत्याखाली सपोनि रमेश गर्जे, पोउनि अमित पाटील, पोलीस अंमलदार उत्तम दबडे, अतिश घाडगे, संतोष पवार, संतोष सपकाळ, शरद बेबले, साबीर मुल्ला, लक्ष्मण जगधने, प्रविण फडतरे, निलेश काटकर,मुनीर मुल्ला, गणेश कापरे, विशाल पवार, मोहन पवार, पृथ्वीराज जाधव, रोहित निकम, सचिन ससाणे, वैभव सावंत, मयुर देशमुख, स्वप्नील दौंड,धीरज महाडीक, मोहसीन मोमीण, शिवाजी गुरव यांनी सहभाग घेतला असुन कारवाईत सहभागी अधिकारी व अंमलदार यांचे मा.पोलीस अधीक्षक सातारा तसेच मा.अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी अभिनंदन केले आहे.

---

(पोलीस अधीक्षक सातारा यांचे मान्यतेने )

प्रति,

सर्व संपादक...

